इंग्रजीत टंकलिखीत केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद

(1996) 3 एस. सी. आर. 815

बशीर अहमद आणि इतर.

विरुद्ध

पंजाब राज्य आणि इतर

22 मार्च ,1996

[ न्यायमूर्ति के. रामास्वामी आणि न्यायमूर्ति जी. बी. पटनायक ]

सेवा कायदाः

पंजाब सरकारने केलेली चालकांची नियुक्ती - स्वच्छकांची चालक म्हणून पदोन्नती - तदनंतर अतिरिक्त असल्याचे आढळून आल्याने कपात करण्यात आली - चालकांची रिक्त पदे थेट नियुक्तीसाठी अधिसूचित केली गेली - शैक्षणिक आणि इतर पात्रता विहित केल्या - आवश्यक शैक्षणिक पात्रतेच्या अभावामुळे कपात केलेल्या चालकांची नियुक्ती केली गेली नाही - रिट याचिका फेटाळली गेली - असे ग्राह्य धरले की उमेदवारांनी निकष पूर्ण न केल्यामुळे रिट याचिका फेटाळणे बेकायदेशीर असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही.

उत्तर प्रदेश आणि इतर राज्ये - वि. - जे. पी. चौरसिया आणि इतर, [1989] 1 एससीसी 121 आणि बी. एन. सक्सेना - वि. - एन .डी .एम.सी., सी. ए. क्रमांक 3496 / १९९०, 25 जुलै 1990 रोजी निर्णय पारित केला. उल्ल्लेख केला आहे.

दिवाणी अपिलीय न्यायाधिकरणः दिवाणी अपील क्र. 6909 / 1996.

पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने दिनांक २२/०२/१९९४ रोजी सी. डब्लू . पी. क्रमांक १२८३८ / १९९३ मधील पारित केलेल्या निकाल आणि आदेशावरून.

अपीलकर्त्यांसाठी :- स्वरूप सिंग, आर. सी. मिश्रा आणि डॉ. मीरा अग्रवाल.

उत्तरवादींसाठी :- मनोज स्वरूप, गिरीश चंद्रा , प्रदीप शर्मा आणि के. पांडे.

न्यायालयाने खालील आदेश पारित केला :

अनुमती मंजूर

विशेष परवानगीद्वारे हे अपील पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने 22 फेब्रुवारी 1994 रोजी ,सी. डब्ल्यू. पी. क्र. 12838/93 मधील पारीत केलेल्या निकाल आणि आदेशावरून उद्भवते. मान्यकेल्यानुसार, अपीलकर्त्यांनी सुरुवातीला (स्वच्छक) सफाई कर्मचारी म्हणून काम केले होते आणि त्यानंतर त्यांना पंजाब राज्याच्या कुक्कुटपालन विभागात चालक म्हणून पदोन्नती देण्यात आली. त्यांची संख्या अतिरिक्त असल्याचे आढळून आल्याने, त्यांची कपात केली गेली. जेव्हा सरकारने पशुसंवर्धन विभागात थेट भरतीसाठी अधिसूचना जारी केली होती, तेव्हा अपीलकर्त्यांनीही थेट भरतीसाठी अर्ज केले होते. त्यांच्याकडे आवश्यक शैक्षणिक पात्रता नसल्याच्या कारणावरून त्यांची निवड करण्यात आली नाही. परिणामी, त्यांनी रिट याचिका दाखल केली जी फेटाळण्यात आली. म्हणून, विशेष अनुमतीद्वारे हे अपील दाखल.

अपीलकर्त्यांच्या विद्वान वकिलाने जोरदार युक्तिवाद केला की ह्या न्यायालयाने सी. ए. क्रमांक 3496 / १९१९०, बी. एन. सक्सेना विरुद्ध. एन. डी.एम. सी., मध्ये 25 जुलै 1990 रोजी असा निर्णय दिला की प्रारंभिक नियुक्तीनंतर बराच काळ अनुभव मिळविणे हिच पदोन्नतीसाठी पात्रता आहे आणि त्यामुळे पुढील शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता कायद्याने मान्य नाही. त्यांनी ' उत्तर प्रदेश राज्य आणि इतर - विरुद्ध - जे. पी. चौरसिया आणि इतर [1989] 1 एससीसी 121, या आणखी एका निकालावरही भर दिला. त्यावर अवलंबून, असा युक्तिवाद केला गेला की थेट भरतीसाठी पात्रता म्हणून शैक्षणिक पात्रता निर्धारित करणारा नियम वाचायला पाहिजे. म्हणून तो नियम वाचा, अपीलकर्त्यांना आवश्यक अनुभव असल्याने, तो अनुभव भरतीसाठीची पात्रता असल्याचा समजायला पाहिजे. उच्च न्यायालय आणि भरती प्राधिकरणाने घेतलेला दृष्टिकोन कायद्याने अमान्य आहे. त्या युक्तीवादात आम्हाला कोणताही जोर दिसत नाही. असे दिसून येते की वाहनचालक म्हणून थेट

भरतीसाठी, नियमनामध्ये दोन पात्रता विहित केल्या आहेत, त्या म्हणजे, हलके वाहन चालविण्याचा परवाना आणि माध्यमिक श्रेणीपर्यंतचे पंजाबी भाषेचे ज्ञान. नियमाप्रमाणे, खालच्या श्रेणींमधील सफाई कामगारांमधून 10 टक्के कामगारांची चालक म्हणून शिफारस करण्यात आली आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, थेट भरतीसाठी विहित केलेल्या पात्रतेव्यतिरिक्त, सफाई कामगाराला किमान 4 वर्षांचा अनुभव असणे देखील आवश्यक आहे. सफाई कामगारांच्या संवर्गातून चालकाच्या पदावर १० टक्के कोट्यातून होणाऱ्या पदोन्नतीबाबत आम्ही चिंतित नाही. त्यामुळे नियम वाचण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आमच्या दृष्टीने केवळ थेट भरतीचा मुद्दा महत्वाचा आहे. नियमांनुसार सरकारने वाहन चालवण्याचा परवाना आणि माध्यमिक श्रेणी पर्यंत पंजाबी भाषेचे ज्ञान ही पात्रता ठरवली आहे. त्यामुळे, अशी पात्रता असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा भरतीसाठी विचार केला पाहिजे. मान्य केल्यानुसार, अपीलकर्ते उक्त निकषांची पूर्तता करीत नसल्यामुळे, रिट याचिका फेटाळणे बेकायदेशीर असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही.

त्यानुसार याचिका फेटाळली जाते. खर्चाबाबत कुठलाही आदेश नाही.

याचिका फेटाळण्यात आली.

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.